जिल्ह्यांना उद्यासाठी रेड अलर्ट दिला आहे. तर **रायगड, सिंधुदुर्ग, पुणे** आणि **कोल्हापूर** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**मुंबई** शहर भागात काल ८२ मिलीमीटर, पूर्व उपनगरात ९६ तर पश्चिम उपनगरात ९० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. आजही पाऊस कायम असल्यानं मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचून वाहतूक कोंडी झाली.

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सलग सुरू असलेल्या पावसानं आज थोडीशी उसंत घेतली. नद्यांची पाणीपातळीही आता ओसरू लागली असून, दुपारी खेडमधली **जगबुडी** आणि राजापुरातली **कोदवली** या दोनच नद्या इशारा पातळीवरून वाहत होत्या.

**पालघर** जिल्ह्यात मुसळधार पाऊस असून कोणत्याही भागात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांच्या मदतीसाठी NDRF ची 21 जणांची एक तुकडी तैनात करण्यात आली आहे. **धुळे** जिल्ह्यात तापी नदीवरच्या हतनूर धरणक्षेत्रात पाण्याची आवक वाढली असून धरणातून ४ हजार २३८ क्यूसेक इतका विसर्ग सुरू आहे. त्यामुळे प्रशासनानं नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याच्या सूचना केल्या आहेत.

**सांगली** जिल्ह्यातल्या वारणा आणि कृष्णा नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

**कोल्हापुरात** पंचगंगा नदीनं इशारा पातळी ओलांडल्याने पुराचा धोका निर्माण झाला आहे. जिल्ह्यातले ८१ बंधारे पाण्याखाली गेले असून दीडशेहून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे.

**भंडारा** जिल्ह्यात लाखांदूर तालुक्यातल्या ओपारा गावात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

